20 47

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** लातूर **P.S.(ठाणे):** उदगीर ग्रामीण **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0512 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 25/11/2021 00:55 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 24/11/2021

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 24/11/2021

**Time From (वेळेपासून):** 12:46 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:26 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 25/11/2021 **Time (वेळ):** 00:09 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 002 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 25/11/2021 00:09 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पोस्टे उदगीर ग्रामीण

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** चंद्रकांत नरसिंग सुर्यवंशी

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1969 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | समता नगर उदगीर ,उदगीर ग्रामीण,लातूर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | समता नगर उदगीर ,उदगीर ग्रामीण,लातूर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-7262964924

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | भगवान व्यंकटराव गिरी | | | 1. पोस्टे उदगीर ग्रा ,उदगीर ग्रामीण,लातूर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | रोख रक्कम 5000 रु | 5,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 5,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी चंद्रकांत नरसिंग सुर्यवंषी वय 52 वर्षे, व्यवसाय रिक्षाचालक रा. समता नगर ता. उदगीर जि. लातूर मो.नं. 7262964924समक्ष फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणचा राहणारा असुन रिक्षा चालवून कुटंुबाचा उदरनिर्वाह करतो े. मी दिनांक 23/11/2021 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर कार्यालयात जावुन पोलीस उपअधीक्षक रेजितवाड साहेब यांची भेट घेवुन माझी एका लोकसेवका विरुध्द लाच मागणीची तक्रार असल्याचे सांगुन त्यांना दिनांक 24/11/2021 रोजी उदगीर येथील इच्छापूर्ती जवळील बायपास रोड पासुन थोडया अंतरावर थांबतो तुम्ही या असे सांगुन माझे काम असल्याने मी लगेच परत उदगीर येथे आलो होतो. आज दिनांक 24/11/2021 रोजी सकाळी 10.00 वा. इच्छापूर्ती जवळील बायपास रोड पासुन थोडया अंतरावर थांबलो असताना माझे जवळ एका खाजगी वाहनाने येवून पोलीस उपअधीक्षक रेजितवाड यांनी सापळा पथकातील सदस्य व पंचाची ओळख करून देवून पंचाकरवी माझे नांव गांव विचारले असता मी त्यांना माझे नं ाव वरील प्रमाणे सांगुन मी माझी तोंडी तक्रार सांगुन सविस्तर लेखी तक्रार दिली ती खालील प्रमाणे. दि.18/11/2021 रो ेजी माझ ा ी पत्नी सुवर्णा चंद्रकांत सुर्यवंषी हीचे व आमची नातेवाईक षेजारी राहणारी नंदा बबन कांबळे यांच्यात कां ेबडयांच्या कारणांवरुन वाद झाला होता. त्या वादावरुन नंदा बबन कांबळे यांनी आमच्या विरोधात पोलीस ठाणे उदगीर ग्रामीण येथे तक्रार दिली. त्या अनुशंगाने दि.19/11/2021 रोजी उदगीर ग्रामीणचे बीट जमादार गिरी यांनी मला तुझ्या बायकोवर पोलीस स्टेषनला गुन्हा दाखल झाला असून अटक करावी लागेल तुम्ही पोलीस स्टेषनला या असे फोनवरुन सांगितल्याने त्यावरुन मी पोलीस स्टेषन उदगीर ग्रामीण येथे गेलो असता मला बीट जमादार गिरी यांनी नंदा कांबळे यांनी दि.18/11/2021 रोजी दिलेल्या तक्रारी वरुन दाखल झालेल्या गुन्हयात तुमच्या बायकोला अटक न करण्यासाठी व गुन्हयात आमचे बाजूने तपास करुन मदत करण्यासाठी म्हणून 25,000/- रुपये लाचेची मागणी केलेली आहे. माझे वर नमुद कामासाठी मला संबंधीत पोलीस बीट जमादार गिरी यांना कोणत्याही प्रकारची लाच देण्याची इच्छा नाही. त्यांचा व माझा कसलाही अर्थिक देण्याघेण्याचा व्यवहार नाही किंवा त्यांच्याषी माझे पुर्व वैमनष्य नाही. तरी उदगीर ग्रामीण पोस्टे चे संबंधीत पोलीस बीट जमादार गिरी यांनी माझे वर नमुद कामासाठी लाचेची मागणी करुन ती स्वतः अथवा इतरा मार्फत स्विकारल्यास त्यांचेवर कार्यवाही करावी. अषा आषयाची लेखी तक्रार दिली. मी दिलेली तक्रार ही पोलीस उपअधीक्षक रेजितवाड साहेब व पंचानी वाचुन पाहुन तक्रार व तक्रारी अर्जावर स्वाक्ष-या केल्या आहेत.पोलीस उपअधीक्षक रेजितवाड यांनी मी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने बीट जमादार गिरी यांनी मला माझ्या वर नमुद कामासाठी लाचेची मागणी केली आहे. अगर कसे ? याची पडताळणी करुन ती ध्वनीमुद्रीत करण्याचे ठरवुन त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बाबत मला व पंचांना माहिती सांगुन व ते कोरे असल्याचे खात्री करुन देवुन त्यामध्ये नविन कोरे मेमरी कार्ड टाकुन माझे व दोन्ही पंच तसेच पोलीस उपअधीक्षक रेजितवाड यांचे वक्तव्य ध्वनिमुद्रीत करुन पडताळणी करण्याचे ठरविले व सापळा कार्यवाही बाबत मला व पंचांना तसेच सापळा पथकातील सदस्य यांना योग्य त्या सुचना देवुन पोक

13.**Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): DeepakKumar Chudaman Waghmare(I (Inspector)) / POBN72857 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14.**Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची
पो. ठाणे अंमलदार
उदगीर ग्रामीण
**Name** (नाव): DeepakKumar Chudaman
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN72857

फिर्याद दिनांक २४/११/२०२१

मी चंद्रकांत नरसिंग सुर्यवंशी वय ५२ वर्षे, व्यवसाय रिक्षाचालक रा. समता नगर ता. उदगीर जि. लातूर मो.नं. ७२६२९६४९२४

समक्ष फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणचा राहणारा असुन रिक्षा चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. मी दिनांक २३/११/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर कार्यालयात जावुन पोलीस उपअधीक्षक रेजितवाड साहेब यांची भेट घेवुन माझी एका लोकसेवका विरुध्द लाच मागणीची तक्रार असल्याचे सांगुन त्यांना दिनांक २४/११/२०२१ रोजी उदगीर येथील इच्छापूर्ती जवळील बायपास रोड पासुन थोडया अंतरावर थांबतो तुम्ही या असे सांगुन माझे काम असल्याने मी लगेच परत उदगीर येथे आलो होतो.

आज दिनांक २४/११/२०२१ रोजी सकाळी १०.०० वा. इच्छापूर्ती जवळील बायपास रोड पासुन थोडया अंतरावर थांबलो असताना माझे जवळ एका खाजगी वाहनाने येवून पोलीस उपअधीक्षक रेजितवाड यांनी सापळा पथकातील सदस्य व पंचाची ओळख करून देवून पंचाकरवी माझे नांव गांव विचारले असता मी त्यांना माझे नांव वरील प्रमाणे सांगुन मी माझी तोंडी तक्रार सांगुन सविस्तर लेखी तक्रार दिली ती खालील प्रमाणे.

"दि.१८/११/२०२१ रोजी माझी पत्नी सुवर्णा चंद्रकांत सुर्यवंशी हीचे व आमची नातेवाईक शेजारी राहणारी नंदा बबन कांबळे यांच्यात कोंबडयांच्या कारणांवरुन वाद झाला होता. त्या वादावरुन नंदा बबन कांबळे यांनी आमच्या विरोधात पोलीस ठाणे उदगीर ग्रामीण येथे तक्रार दिली. त्या अनुषंगाने दि.१९/११/२०२१ रोजी उदगीर ग्रामीणचे बीट जमादार गिरी यांनी मला तुझ्या बायकोवर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल झाला असून अटक करावी लागेल तुम्ही पोलीस स्टेशनला या असे फोनवरुन सांगितल्याने त्यावरुन मी पोलीस स्टेशन उदगीर ग्रामीण येथे गेलो असता मला बीट जमादार गिरी यांनी नंदा कांबळे यांनी दि. १८/११/२०२१ रोजी दिलेल्या तक्रारी वरुन दाखल झालेल्या गुन्हयात तुमच्या बायकोला अटक न करण्यासाठी व गुन्हयात आमचे बाजूने तपास करुन मदत करण्यासाठी म्हणून २५,०००/- रुपये लाचेची मागणी केलेली आहे. माझे वर नमुद कामासाठी मला संबंधीत पोलीस बीट जमादार गिरी यांना कोणत्याही प्रकारची लाच देण्याची इच्छा नाही. त्यांचा व माझा कसलाही अर्थिक देण्याघेण्याचा व्यवहार नाही किंवा त्यांच्याशी माझे पुर्व वैमनश्य नाही. तरी उदगीर ग्रामीण पोस्टे चे संबंधीत पोलीस बीट जमादार गिरी यांनी माझे वर नमुद कामासाठी लाचेची मागणी करुन ती स्वत: अथवा इतरा मार्फत स्विकारल्यास त्यांचेवर कार्यवाही करावी.'' अशा आशयाची लेखी तक्रार दिली. मी दिलेली तक्रार ही पोलीस उपअधीक्षक रेजितवाड साहेब व पंचानी वाचुन पाहुन तक्रार व तक्रारी अर्जावर स्वाक्ष-या केल्या आहेत.

पोलीस उपअधीक्षक रेजितवाड यांनी मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने बीट जमादार गिरी यांनी मला माझ्या वर नमुद कामासाठी लाचेची मागणी केली आहे. अगर कसे ? याची पडताळणी करुन ती ध्वनीमुद्रीत करण्याचे ठरवुन त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बाबत मला व पंचांना माहिती सांगुन व ते कोरे असल्याचे खात्री करुन देवुन त्यामध्ये नविन कोरे मेमरी कार्ड टाकुन माझे व दोन्ही पंच तसेच पोलीस उपअधीक्षक रेजितवाड यांचे वक्तव्य ध्वनिमुद्रीत करुन पडताळणी करण्याचे ठरविले व सापळा कार्यवाही बाबत मला व पंचांना तसेच सापळा पथकातील सदस्य यांना योग्य त्या सुचना देवुन पोकॉ कच्छवे यांना पोलीस स्टेशन उदगीर ग्रामीण जवळ जावुन डिजीट व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन देण्याबाबत सांगितले.

त्याप्रमाणे मी व पंच कमांक १ गायकवाड तसेच पोकॉ कच्छवें असे माझेकडील मोटार सायकलवर पोलीस स्टेशन उदगीर ग्रामीण जवळ असलेल्या विकास बार अॅड रेस्टॉरंट जवळ येवुन तेथुन पोकॉ कच्छवे यांनी १२.४६ वा. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डचे बटन चालु करुन माझ्या गळयात आडकविले. मी व पंच कमांक १ गायकवाड असे माझ्याकडील मोटार सायकलवर उमा चौकातील हॉटेल मध्ये जावुन गाडी उभी करुन आम्ही दोघे त्यांच्या जवळ जावुन त्यांची पंचासमक्ष भेट घेवुन मी नंदा कांबळे यांनी आमच्या विरुध्द दिलेल्या तक्रारी अर्जावरुन दाखल झालेल्या अनुषंगाने चर्चा केली असता, पोलीस बीट जमादार गिरी म्हणाले की, आणले नाही का... त्यावर मी त्यांना ते तिच्याकडेच हायत तिला जावून घेवून येतो घराकडून किती वेळ लागेल.. तुम्हाला कुठं भेटू तुम्हाला.. त्यावर बीट जमादार यांनी अर्धातास.. असे म्हणून पोलीस स्टेशन उदगीर ग्रामीण येथे या असे सांगून मला दुसरा आरोपी अटक करायचाय असे म्हणून घाईघाईत निघून गेल्याने मी व पंच कमांक १ गायकवाड असे परत पोकॉ कच्छवे यांच्या जवळ आलो असता पोकॉ कच्छवे यांनी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद केले. तेथुन आम्ही खाजगी वाहनाजवळ आलो असता पोलीस उपअधीक्षक रेजितवाड यांनी माझ्या समक्ष पंच कमांक १ गायकवाड यांना लाचेच्या मागणीच्या अनुषंगाने माझ्यात व बीट जमादार गिरी यांच्यात काय बोलने झाले याबाबत विचारणा केली त्यावेळी पंच कमांक १ गायकवाड यांनी मी वर नमुद केल्या प्रमाणे हकीकत सांगितली. आम्ही सर्वांनी पोलीस कर्मचारी कच्छवे यांचे मार्फतीने

डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्यात व बीट जमादार गिरी यांच्यात झालेले संभाषण ऐकुन ते पंच क्रमांक १ यांनी
सांगितलेल्या हकीकती प्रमाणे असल्याचे खात्री करुन बीट जमादार गिरी यांनी झालेल्या संभाषणामध्ये बीट जमादार गिरी घाईत
असल्याने लाचेची मागणी बाबत स्पष्टता दिसून येत नसल्यामूळे पोलीस उपअधीक्षक पंडीत रेजितवाड साहेब व पंच असे
सर्वानुमते पुन्हा एकदा लाच मागणी पडताळणी करिता पाठविण्याचे ठरविण्यात आले.

त्याप्रमाणे मी माझी पत्नी सुवर्णा, पंच क्रमांक १ गायकवाड तसेच पोकॉ कच्छवें असे पायी चालत पोलीस स्टेशन
उदगीर ग्रामीण जवळ असलेल्या विकास बार अँड रेस्टॉरंट जवळ येवुन तेथुन पोकॉ कच्छवे यांनी १४.३२ वा. डिजीटल व्हॉईस
रेकॉर्डचे बटन चालु करुन माझ्या गळयात आडकविले. मी व पंच क्रमांक १ गायकवाड असे पायी चालत पोलीस स्टेशन
उदगीर ग्रामीण येथे जावुन बीट जमादार गिरी यांची पंचासमक्ष भेट घेवुन मी नंदा कांबळे यांनी आमच्या विरुध्द दिलेल्या तक्रारी
अर्जावरुन दाखल झालेल्या गुन्हयाच्या अनुषंगाने चर्चा केली असता, बीट जमादार गिरी म्हणाले की, ते काल सगळ घेतलय
सहया घेतल्या तिच्या,.. त्यावर मी त्यांना म्हणालो की, रजिस्टरवर नाही घ्यायला.. त्यावर पोलीस बीट जमादार गिरी म्हणाले
की, रजिस्टरवर गरज नाही... त्यावर मी त्यांना मग आता किती देवू साहेब.. तरी कारण की पोरानं मला दहाबारा फोन
लावलेत, त्यावर पोलीस बीट जमादार गिरी म्हणाले की, कुण्या पोरानं... त्यावर मी, त्यांना आडतीवर पाठवलो ना त्येला
पैशाकरिता.. त्यावर पोलीस बीट जमादार गिरी यांनी हाताच्या बोटाच्या इशा–याचे तीन बोटे दाखवून तुम्ही द्या...म्हणाले त्यावर
मी त्यांना हे तीन हजार असे म्हणालो असता त्यावर बीट जमादार गिरी म्हणाले की तीस... त्यावर मी, त्यांना तीस...वीस..
जरा जास्त होतय जरा माझ्या कडे बगा... त्यावर बीट जमादार गिरी यांनी , **पंचवीस म्हणले होते..** असे म्हणाले त्यावर मी,
नाही नाही मी काय म्हणतो आज थोडे देतो... सोयाबीन विकल्यावर मी दोन तीन टप्यात... असे म्हणालो असता त्यावर बीट
जमादार गिरी हे **पंधरा आता द्या...पाच नंतर द्या..** असे म्हणाले त्यावर मी, पंधरा होत नाहीत साहेब.. नाय नाय काय झालं
पोरानं फोन केला मला अन कीती आणायचेत आडतीवाल्याकडून तर मी म्हणलो पंचवीस म्हणल्यास त्येनं म्हणलं पंचवीस लई
पप्पा जास्त होत्यात.. म्हणल्यामुळं म्हणलाव.. पाच देतो तुम्हाला त्यावर बीट जमादार म्हणाले १० कमी द्या...त्यावर मी,
किती? असे म्हणालो असता त्यावर बीट जमादार १० कमी द्या.....पंधरा.. असे म्हणाले त्यावर मी, १० कमी.. बीट जमादार
हं.. असे म्हणाल्याने मी त्यांना पंधरा... म्हणलो असता त्यावर बीट जमादार गिरी म्हणाले की **खुश होवून द्या नाराज होवू**
**नका...** असे म्हणाले त्यावर मी नाही नाही आज जेवढे होतील तेवढे देतो.. असे म्हणून निघताना बीट जमादार गिरी यांना मी
म्हणालो की **मी आता काय करतो एक आर्ध्या तासाने पाच तेवढे आणून देतो...** पाच हजार असे म्हणालो असता त्यावर बीट
**जमादार गिरी यांनी पाच का बर ? त्यावर मी उद्याला देतो दहा... उद्याला पंधरा देतो** आज पाच देतो असे म्हणालो असता
त्यावर बीट जमादार गिरी यांनी हं.. चालतय असे म्हणून सुरुवातीस २५,०००/– रुपयाची व तडजोडी अंती २०,०००/–
रुपयाची लाचेची मागणी करुन पहिला हप्ता ५०००/– रुपये लाचेची मागणी केली. मी त्यांना थोडयावेळात घेवुन येतो असे
म्हणुन मी माझी पत्नी सुवर्णा, पंच क्रमांक १ गायकवाड असे परत पोकॉ कच्छवे यांच्या जवळ आलो असता पोकॉ कच्छवे
यांनी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद केले. तेथुन आम्ही खाजगी वाहनाजवळ आलो असता पोलीस उपअधीक्षक रेजितवाड
यांनी माझ्या समक्ष पंच क्रमांक १ गायकवाड यांना लाचेच्या मागणीच्या अनुषंगाने माझ्यात व बीट जमादार गिरी यांच्यात काय
बोलने झाले याबाबत विचारणा केली त्यावेळी पंच क्रमांक १ गायकवाड यांनी मी वर नमुद केल्या प्रमाणे हकीकत सांगितली.
आम्ही सर्वानी पोलीस कर्मचारी कच्छवे यांचे मार्फतीने डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्यात व बीट जमादार गिरी
यांच्यात झालेले संभाषण ऐकुन ते पंच क्रमांक १ यांनी सांगितलेल्या हकीकती प्रमाणे असल्याचे खात्री करुन बीट जमादार गिरी
यांनी लाचेची मागणी करुन अर्धा तासामध्ये घेवून या असे म्हणाल्याने मी घेवून येतो थोडया वेळात असे म्हणून तेथून मी माझी
पत्नी सुवर्णा, पंच क्र.१ असे निघून आलो.

पोलीस उपअधीक्षक रेजितवाड यांनी मला बीट जमादार गिरी यांना देण्यासाठी लाचेची रक्कम हजर करणे बाबत
कळविले असता मी माझेकडील ५००/–रुपये दराच्या १० चलनी नोटा असे एकुण ५,०००/–रुपये समक्ष हजर केले.
त्यावेळी पोलीस उपअधीक्षक रेजितवाड यांनी मला व पंचांना अॅन्थ्रासीन पावडरचा वापर, गुणधर्म याबाबत माहिती व प्रात्यक्षीक
करुन दाखविले. मी हजर केलेल्या लाचेच्या रक्कमेच्या नोटांना पोना गिरी यांनी अॅन्थ्रासीन पावडर लावुन माझ्या शर्टच्या
छातीवरील डाव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवून बीट जमादार गिरी यांना लाचेची रक्कम दिल्यानंतर आपल्या चेह–यावरील चष्मा
काढुन हातामध्ये घेणे बाबतचा सुनियोजीत ईशारा म्हणुन सांगण्यात आला. पोलीस उपअधीक्षक रेजितवाड यांनी मला, दोन्ही
पंच व सापळा पथकातील सदस्य यांना पुढील सापळा कार्यवाही बाबत सुचना दिल्या. व मला पोलीस उपअधीक्षक रेजितवाड
यांनी मला बीट जमादार गिरी यांनी सांगितल्याप्रमाणे पोलीस स्टेशन उदगीर ग्रामीण येथे लाचेची रक्कम घेवुन येण्यास
सांगितल्याने आम्ही सर्वजन मी व पंच क्रमांक १ तसेच कर्मचारी तसेच सापळा पथकातील सदस्य खाजगी वाहनाने पोलीस

स्टेशन उदगीर ग्रामीण जवळ येवुन तेथे वाहन उभे करुन तेथे पोलीस उपअधीक्षक रेजितवाड यांनी पुढील सापळा कार्यवाही कामी परत सुचना देवुन पोलीस कर्मचारी कच्छवे यांचे मार्फतीने डिजीटल व्हाईस रेकॉर्डर १५.२४ वा. चालु करुन माझ्या गळयात आडकविले. मी व पंच क्रमांक १ गायकवाड असे पोलीस स्टेशन उदगीर ग्रामीण येथे गेलो. व सापळा पथकातील सदस्य व पंच क्रमांक २ कांबळे असे खाजगी वाहनातुन उतरुन आमच्या पाठीमागे येत असल्याचे दिसले. मी माझी पत्नी सुवर्णा, पंच क्रमांक १ असे उदगीर ग्रामीण पोलीस स्टेशन मध्ये बीट जमादार यांच्या रुममध्ये जावून मी माझ्या कामाबाबत चर्चा करुन माझ्याकडील ५,०००/—रुपये ॲन्थ्रासीन पावडरयुक्त लाचेची रक्कम काढुन बीट जमादार गिरी यांना दिली असता त्यांनी बोला..डॉ सुर्यवंशी साहेब बोला असे म्हणाले असता त्यावर मी,...हेवका हे तुमचे पाच.. त्यावर बीट जमादार पंधरा...? त्यावर मी, सकाळी आणून देतो किंवा संध्याकाळी...अं...**असे** म्हणुन सदर लाचेची रक्कम आपल्या उजव्या हाताने घेवुन त्यांच्या अंगातील शर्टच्या समोरील बाजूने आपल्या पोटावर शर्टइन च्या आत आत ठेवली. त्याच वेळी मी त्यांचे रुमच्या बाहेर येवून नियोजीत लाचस्विकृतीचा इशारा केला. माझ्याकडील व्हाईस रेकॉर्डर पोलीस कर्मचारी कच्छवे यांचेकडे दिले. ते त्यांनी घेवुन बंद केले. त्याचवेळी पोलीस उपअधीक्षक रेजितवाड व पंच क्रमांक २ कांबळे व सापळा पथकातील सदस्य सदर ठिकाणी समोरुन व पाठीमागुन येत असल्याचे पाहुन बीट जमादार गिरी आपल्या रुमच्या बाहेर येवून पोलीस स्टेशन आवारातून पळत निघून उदगीर ते नांदेड रोडकडे जावून बाजूच्या कंपाउंड वॉल वरुन शेतामध्ये उडी टाकून पळत असताना मी, पोलीस उपअधीक्षक रेजितवाड साहेब व सापळा पथकातील सदस्य यांनी त्यांचा पाठलाग करुन त्यांना लागलीच ताब्यात घेतले. त्यानंतर पोलीस उपअधीक्षक रेजितवाड यांनी पंच क्रमांक १ गायकवाड यांना लाचेची रक्कम कोणी मागणी करुन कोण स्विकारली? याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक १ गायकवाड यांनी हेच ते पोलीस बीट जमादार असुन तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम स्विकारुन आपल्या अंगातील शर्टच्या बाजुने पोटावर शर्टइन व बनियनच्या मध्ये ठेवली असल्याचे सांगितले. त्यावेळी पोलीस उपअधीक्षक रेजितवाड यांनी त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव भगवान व्यंकटेश गिरी वय ३२ वर्षे, पद पोलीस नाईक, वर्ग—३, नेमणुक पोलीस उदगीर ग्रामीण ह.मु. उदय पेट्रोल पंपाच्या पाठीमागे, महादेव नगर उदगीर जि. लातूर रा. रावी ता. मुखेड जि. नांदेड असे असल्याचे सांगितले. पोलीस उपअधीक्षक रेजितवाड यांनी माझे व पंचासमक्ष पोलीस बीट जमादार गिरी यांना लाचेची रक्कम कोठे ठेवली याबाबत विचारणा केली असता त्यांनी सदर रक्कम ही पळत असताना कंपाउंड वरुन उडी मारुन लगेच टाकली असल्याचे सांगितल्याने पंचासमक्ष अल्ट्राव्हायलेट लॅम्पखाली पाहणी केली असता पोलीस बीट जमादार गिरी यांच्या उजव्या हाताच्या बोटाच्या पे—यास व तळहातावर तसेच शर्टच्या पोटावरील समोरील व आतील बाजूस ॲंथ्रासिन पावडरची हिरवट चकाकी दिसून आली. सदर ठिकाणी पंचामार्फत पोलीस बीट जमादार यांची अंगझडती घेतली असता त्यांच्याकडे लाचेची रक्कम किंवा इतर वस्तु मिळुन आली नाही. त्यांनतर पोलीस उपअधीक्षक रेजितवाड यांनी सदर ठिकाणी कंपाउंड लगत असलेल्या जागेत पंचासमक्ष सापळा पथकातील सदस्यांच्या मदतीने शोध घेतला असता सदर रक्कम ही कंपाउंडच्या बाजूला शेतामध्ये मिळून आली सदर रक्कमेतील नोटांच्या नंबरची पंचासमक्ष पडताळणी करुन जप्त करुन अल्ट्राव्हाईलेट लॅम्पखाली पाहणी केली असता नोटांवर ॲन्थ्रासीन पावडरची हिरवट चकाकी दिसुन आली. त्यानंतर पोलीस उपअधीक्षक रेजितवाड यांनी पोलीस बीट जमादार गिरी यांना ताब्यात घेवून त्यांनतर पुढील कार्यवाही ही पोलीस स्टेशन उदगीर शहर येथे येवुन पुढील कार्यवाही पुर्ण केली.

**तरी यातील लोकसेवक भगवान व्यंकटेश गिरी वय ३२ वर्षे, पद पोलीस नाईक, वर्ग—३, नेमणुक पोलीस स्टेशन उदगीर ग्रामीण ह.मु. उदय पेट्रोल पंपाच्या पाठीमागे, महादेव नगर उदगीर जि. लातूर रा. रावी ता. मुखेड जि. नांदेड यांनी आज दिनांक २४/११/२०२१ रोजी पोलीस स्टेशन उदगीर ग्रामीण येथे माझ्या पत्नी विरोधात दिनांक १८/११/२०२१ रोजी नंदा बबन कांबळे यांनी दिलेल्या तक्रारी वरुन दाखल झालेल्या गुन्हयात अटक न करण्यासठी व गुन्हयाचे तपासात आमच्या बाजूने तपास करुन मदत करण्यासाठी पंचासमक्ष सुरुवातीला २५,०००/— रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती २०,०००/— रुपये लाचेची मागणी करुन पहिला हप्ता ५,०००/— रुपये लाचेची मागणी करुन आज १५.२६ वाजता पोलीस स्टेशन उदगीर ग्रामीण येथील स्वत: चे रुममध्ये ५०००/— रुपये लाचेची रक्कम पंचासमक्ष स्वत: स्विकारुन राहीलेली रक्कम नंतर आणून देण्यास सांगितले म्हणुन माझी त्यांच्या विरुध्द कायदेशिर तक्रार आहे.**

मी वर नमुद प्रमाणे सांगितलेली तक्रारी पोना गिरी यांनी लॅपटॉपवर टंकलिखीत केली असुन त्यांची प्रींट काढल्यानंतर ती मी वाचुन पाहिली ती मी सांगितल्या प्रमाणे बरोबर आहे.

S. Chakot